# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/ २८९३०२८ ई-मेल:moh@mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./३७२२ /२०२५-२६ दिनांक :०५ /०२ /२०२६.

प्रति,
१. सिस्टम मॅनेजर,
माहिती व तंत्रज्ञान विभाग.
२. जनसंपर्क अधिकारी,
माहिती जनसंपर्क विभाग.
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :-** फेरनिविदा जाहिर सूचना मिरा भाईंदर महानगरपालिका संकेतस्थळ व वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील तळमजल्यावरील जागेत नव्याने सुरु करण्यात आलेला 15 खाटांच्या क्षमतेचा डायलिसिस युनिट सुरु करण्यात आलेला आहे. सदर डायलिसिस युनिट चालविणेकामी आवश्यकतेनुसार वैद्यकीय विशेषज्ञ (नेफ्रॉलॉजीस्ट), वैद्यकीय अधिकारी (RMO) व डायलिसिस तंत्रज्ञ इ. मनुष्यबळ पुरवठा करणे व मशिन्स देखभाल दुरुस्ती करणेकामी इच्छुक संस्था/ नेफ्रॉलॉजीस्ट/धर्मादाय रुग्णालय/एन.जी.ओ.इ. ची निवड करणेकामी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

सदरची फेरनिविदा जाहिर सूचना मिरा भाईंदर महानगरपालिका संकेतस्थळ www.mbmc.gov.in, https://mahatenders.gov.in व जास्त खपाच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत फेरनिविदा जाहिर सूचना जोडली आहे.

(कविता बोरकर)
उपायुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत-
सिस्टम आर्नॅलिस्ट.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन , मांडली तलाव , भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१ . दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल: mohmbmc4@gmail.com / moh@mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ./3623 /२०२५-२६ दिनांक:-०५ /०२ /२०२६.

### //जाहिर फेरनिविदा सूचना//

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील तळमजल्यावरील जागेत नव्याने सुरु करण्यात आलेला १५ खाटांच्या क्षमतेचा डायलिसिस युनिट सुरु करण्यात आलेला आहे. सदर डायलिसिस युनिट चालविणेकामी आवश्यकतेनुसार वैद्यकीय विशेषज्ञ (नेफ्रॉलॉजीस्ट), वैद्यकीय अधिकारी (RMO) व डायलिसिस तंत्रज्ञ इ. मनुष्यबळ पुरवठा करणे व मशिन्स देखभाल दुरुस्ती करणेकामी इच्छुक संस्था/ नेफ्रॉलॉजीस्ट/धर्मादाय रुग्णालय/एन.जी.ओ.इ. ची निवड करणेकामी दोन लिफाफा प्रध्दतीने निविदा प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म व सूचना दि.०६/०२/२०२६ ते दि.१६/०२/२०२६ दु. १२.०० वाजेपर्यंत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

तसेच सदरकामी मागविलेले निवदा प्रस्ताव दि. १७/०२/२०२६ रोजी दु. १.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर स्वीकारण्यात येतील व तांत्रिक लिफापा दि. १८/०२/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येईल. कोणत्याही प्रकारची ऑनलाईन निविदा स्वीकारणे व नाकारणे याबाबतचा अंतिम अधिकार मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

(कविता बोरकर)
उपायुक्त (सार्व. आ.वि.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

## दर व देकार (Offer) फॉर्म

कामाचे नाव : मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील तळमजल्यावरील जागेत नव्याने सुरु करण्यात आलेला १५ खाटांच्या क्षमतेचा डायलिसिस युनिट चालविणेकामी आवश्यकतेनुसार वैद्यकीय विशेषज्ञ (नेफ्रॉलॉजीस्ट), वैद्यकीय अधिकारी (RMO) व डायलिसिस तंत्रज्ञ इ. मनुष्यबळ पुरवठा करणे व युनिटमधील मशीन्सच्या देखभाल दुरुस्ती करणेकामी दर व देकार (Offer) प्रस्ताव मागविणेबाबत..

दर व देकार (Offer) प्रस्ताव सादर करणाऱ्याचे नाव, पत्ता व संपर्क क्र.

..........................................................................................................................

..............................................................................................

..........................................................................................................................

..............................................................................................

| अ.क्र. | कामाचा तपशिल | कामाचे स्वरुप | सादर करावयाचा मासिक दर (रु. मध्ये सर्व करांसहित) व देकार (Offer) |
|---|---|---|---|
| १ | मनुष्यबळ पुरवठा | वैद्यकीय विशेषज्ञ (नेफ्रॉलॉजीस्ट) | |
| | | वैद्यकीय अधिकारी (RMO) | |
| | | डायलिसिस तंत्रज्ञ | |
| २ | मशीन्स वार्षिक देखभाल दुरुस्ती | युनिट मधील मशीन्स व R.O. Plant यांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | |
| | | एकूण | |

### <u>प्रस्ताव सादर करणेकामीच्या नियम व अटी-शर्ती</u>

१. कामाविषयीची सविस्तर माहिती विनामूल्य कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प), ठाणे. येथे मिळेल.

२. प्राप्त प्रस्तावातील एक अथवा सर्व प्रस्ताव कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क महानगरपालिकेने रोखून ठेवला आहे.

३. प्रस्ताव सादर करणाऱ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना दोन लिफाफा पध्दतीने खालीलप्रमाणे सादर करावयात (लिफाफा क्र.०१ कागदपत्रे व लिफाफा क्र. ०२ दर व देकार (offer))

**अ) लिफाफा क्र. १ मध्ये खालील कागदपत्रांचा समावेश करणे आवश्यक आहे.**

१. संस्था/नेफ्रॉलॉजीस्ट/धर्मादाय रुग्णालय/एन.जी.ओ. प्रचलित कायदे/नियम/अधिनिमांतर्गत नोंदणीकृत असलयाचे प्रमाणपत्र,

२. पॅनकार्ड,

३. जी. एस.टी रजिस्ट्रेशन सर्टिफीकेट.

४. शासकीय/निमशासकीय/खाजगी क्षेत्रात किमान १० खाटांचा डायलिसिस युनिट चालविल्याच्या कामाचा अनुभव दाखला.

५. मागील ०३ वर्षाची आयटी रिटर्न (सन २०२२-२०२३, २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या वर्षाचे)

६. शासकीय व निमशासकीय काळ्या यादीत समाविष्ट केले नसल्याबाबतचे स्वयंघोषणा पत्र/हमीपत्र.

७. लिफाफा क्र.०१ मध्ये जोडलेली सर्व कागदपत्रे व माहिती सत्य असल्याचे रु. १००/- च्या स्टँप पेपरवर हमीपत्र करून जोडावे.

**आ) लिफाफा क्र. २ मधील कागदपत्रांचा समावेश करणे आवश्यक आहे.**

१. दरपत्रक व देकार (Offer).

लिफाफा क्र.०१ मधील कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या निविदाधारकांचा लिफाफा क्र.०२ उघडण्यात येईल.

**सर्वसाधारण अटी व शर्ती-**

१. युनिट मधील उपलब्ध सर्व मशिन्स कार्यन्वित ठेवणे व मशिन्सची निगा राखणे बंधनकारक असेल.

२. जर एखादी मशिन्स बंद पडल्यास अथवा ना दुरुस्त झाल्यास किमान तीन दिवसांत दुरुस्ती करून कार्यन्वित करणे बंधनकारक असेल.

३. एखादी मशिन्स वारंवार बंद पडत असल्यास मशिन्स उत्पादक संस्थेकडून तसा तपासणी अहवाल तयार करून सार्वजनिक आरोग्य विभागास सादर करणे.

४. सदर युनिट चालविणेकरीता आवश्यकतेनुसार वैद्यकीय विशेषज्ञ (नेफ्रॉलॉजीस्ट), वैद्यकीय अधिकारी (RMO) व डायलिसिस तंत्रज्ञ उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. तंत्रज्ञ/वैद्यकीय अधिकारी यांचे अनुपस्थीतीमुळे रुग्ण सेवा बाधित होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. रुग्ण तपासणी करीता वैद्यकीय अधिकारी (RMO) यांची उपस्थिती असणे आवश्यक आहे.

६. सदर युनिट चालवित असताना महानगरपालिकेने वेळोवेळी नेमून दिलेले सर्व काम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी आपणांवर राहील. तसेच महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी लागू करण्यात येणा-या अटी व शर्ती व्यतिरिक्त प्रशासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या सूचनांचे पालन आपणांस काटेकोरपणे करावे लागेल. तसेच मुख्यालयास्तरावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधीक्षक, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय यांच्याशी समन्वयाने व नियंत्रणाखाली काम करणे बंधनकारक राहील.

७. डायलिसिस युनिटसाठी लागणारी आवश्यक औषधे व इतर वैद्यकीय साहित्य व उपकरणे महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येतील.

८. डायलिसिस उपचारासाठी कोणते रुग्ण स्वीकारायचे वा नाकारायचे याचा निर्णय घेण्याची जबाबदारी सर्वस्वी आपली असेल. रुग्ण नाकाराचे झाल्यास याबाबतचे स्पष्ट कारण आपण वैद्यकीय अधिक्षक/ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना लेखी कळविणे बंधनकारक आहे.

९. आपल्या कामाचे मूल्यमापन रुग्णालय प्रमुख/विभाग प्रमुख यांच्यामार्फत वेळोवेळी करण्यात येईल. आपले काम समाधानकारक नसल्यास किंवा आपण अधिकारी/कर्मचाऱ्यांशी अशोभनीय/ शिस्तभंग/महानगरपालिकेचा विश्वास गमविणारे वर्तन केल्यास महानगरपालिका प्रशासनाकडून कोणतीही पूर्व सूचना न देता आपणांस देण्यात आलेला कार्यादेश तात्काळ रद्द करण्यात येईल.

१०. रु. ५,००,०००/- किंमतीची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी आपणास महानगरपालिकेस देणे बंधनकारक आहे.

११. कार्यादेश/करारनामा झाल्यापासून कामाचा कालावधी हा ०३ वर्षे असेल.

१२. कामाची वेळ दोन पाळीत (Shift) असेल.

१३. प्रचलित शासकीय नियम पाळणे, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी निविदाकारांवर राहील. तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने निविदाकारांने संबंधित कार्यालयाकडून घेणे बंधनकारक राहील.

१४. महानगरपालिकेच्या आदेशाची अंमलबजावणी करावी लागेल. महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व नियमाचे पालन करावे लागेल. महानगरपालिकेच्या हिताविरुध्द कार्यवाही करता येणार नाही. कार्यालयीन कामाकाजात गोपनीयता राखावी लागेल. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहील.

१५. महानगरपालिकेने आपणास विलंबाने देयक अदा केल्यास अथवा देयक प्रलंबित असल्यास आपले अधिनस्त असलेले डायलिसिस तंत्रज्ञांना दरमहा १० तारखेच्या आत वेतन अदा करावयाची जबाबदारी आपली राहिल. यामध्ये कुठल्याही प्रकारचा वाद झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ही आपली राहील. नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहिन्याच्या 10 तारखेपर्यंत देणे पुरवठाधारकाला बंधनकारक राहील. तसेच प्रचलित कामागार कायदा/निमयांनुसार नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनातून आवश्यक कपाती जसे की, कर, विमा, पीएफ इ. कपात करून ते वेळोवेळो विहित मुदतीत भरणा करणे पुरवठाधारकाला बंधनकारक असेल. याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद/तक्रार प्राप्त झाल्यास सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

१६. निविदाधारकाने प्रस्ताव सादर करताना जाहिर सूचनेतील नियम, अटी व शर्ती मान्य असल्याबद्दल त्यावर शिक्क्यासह सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर असा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही.

१७. पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची/वस्तु व सेवाकराची रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम अदा केली जाईल.

१८. आयकर/व्यवसाय कर तसेच इतर लागू असलेले शासकीय कर भरण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादारकाची राहील.

१९. पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम देय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त केली जाईल.

२०. कंत्राटी कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहील्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. कंत्राटी कर्मचारी रजेवर असल्यास पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

२१. कायम स्वरुपी शासकीय नोकरीसाठी ठेका कर्मचारी महानगरपालिकेकडे /शासनाकडे/न्यायालाकडे दावा अथवा खटला करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र ठेका कर्मचारी यांचेकडून कामावर हजर होताना सादर करणेबाबत पुरवठाधारकाला बंधनकारक राहील.

२२. पुरवठाधारकाने नेमलेल्या अधिकारीक/कर्मचारी यांचे कामगार कायद्यानुसार पगार, रजा, ग्रॅज्युटी, बोनस, विमा योजना, पी.एफ., ई.एस.आय.सी. इत्यादी देय बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन देण्याची जबाबदारी सर्वस्वी पुरवठधारकाची राहिल. याबाबत महानगरपानिकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

**(कविता बोरकर)**
**उपायुक्त (सार्व. आ.वि.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**